दिः5 फेब्रुवारी,2014

# सांप्रदायिक हिंसा विधेयक आणण्याबाबत माझा विरोध

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

गृहमंत्री श्री सुशील कुमार शिंद हे आज सदनात सांप्रदायिक हिंसा विरोधक(न्याय आणि भुर्दंड) विधेयक 2014 मांडणार होते. मी या विधेयकाला मांडण्यास या आधारावर विरोध दर्शविला की याला कायदा बनविण्यास संसदेत विधी संबंधी योग्यतेचा अभाव आहे. माझा विरोध संविधानाच्या सातव्या अनुसूचीत शामिल विधी संबंधातील प्रविष्टाच्या आधारे होता. सातव्या अनुसूचीची सूची 2 राज्यांची सूची आहे. प्रविष्टी 1 शांती व्यवस्थेशी निगडीत आहे. प्रविष्टी 2 पोलिसांना आणि प्रविष्टी 41 राज्यांच्या सार्वजनिक सेवांना संबोधित करते. हे सर्व मुद्दे राज्याच्या अधिकार क्षेत्रात आहेत. संसदेकडे या सर्व मुद्द्यांवर कायदा बनवण्याची वैधानित योग्यता नाही आहे.

प्रस्तावित रुपात विधेयकाने अपराध्यांची एक नवी श्रेणी बनविली आहे. यात जे विभाग गडबडी वाले आहेत त्या विभागांची घोषणा करणे आणि त्यांना अधिसूचित करण्याची गोष्ट आहे. यात सांप्रदायिक हिंसेला आळा घालण्यासाठी पावले सूचविण्यात आली आहेत. यात एक अध्याय असा आहे जो शांति व्यवस्थेला अबाधित राखण्यासाठी संबंधित आहे. यानंतर यात भुर्दंडाची प्रक्रिया आणि राज्य सरकारच्या अधिका-यांच्या विरोधात केली जाणारी कारवाई आणि त्यांच्यावर जे दंड लावण्यात येणार त्याची चर्चा आहे. हे सर्व प्रकरण राज्य कार्यकारिणीच्या अधिकार क्षेत्रात येतात. केंद्रीय कायदा मंत्री यांचे उत्तर असे होते की संघीय रचनेसाठी जोपर्यंत काहीच खतरा नाही आहे तोपर्यंत प्रत्येक विषयासंदर्भातील अधिकार राज्य कार्यकारिणीकडे आहे. माझे उत्तर असे होते की, विधायी शक्ती आणि कार्यकारिणीची शक्ती यांच्यादरम्यान स्पष्ट अंतर आहे. विधायी शक्ती कायदा बनविण्याची शक्ती आहे. माझा विरोध विधी संबंधी योग्यतेची कमी असल्याबद्दलचा आहे. केंद्र असे सांगू शकत नाही की कायदा बनवून, मी राज्याच्या अधिका-यांना अधिकार देतो, कारण सूची-2, प्रविष्टी 1,2,41 च्या अंतर्गत पहिल्याच क्षणी अधिकार केंद्राकडे नाहीत. जवळपास सर्व विरोधी पक्षांनी भाजपाच्या विचारांचे समर्थन केले. तथापि हे विधेयक सुरुवातीसच थांबवले गेले.